# महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

Maharashtra Industrial Development Corporation

(A Government of Maharashtra Undertaking)

मुख्य कार्यालय : "उद्योग सारथी", महाकाली गुंफा मार्ग, अंधेरी (पूर्व), मुंबई ४०० ०९३.
Head Office : "Udyog Sarathi", Mahakali Caves Road, Andheri (East), Mumbai 400 093.
☎ :022-2687 0027/52/54/73 📠 : 022-26871587
www.midcindia.org

प्रिन्सिपल कार्यालय : ४.४ (ऐ १२ वा मजला, वर्ल्ड ट्रेड सेंटर, सेंटर-१, कफ परेड, मुंबई ४०० ००५.
Principle Office : 4.4 (A). 12th Floor. World Trade Centre-1. Cuffe Parade, Mumbai-400 005
☎: +91-22-22151451/52/53 📠 :91-22-22188203
Email : gmland@midcindia.org


जा.क्र: मऔविम/मव्य(भूमी)/B33881 दिनांक: 19/04/2023

## परिपत्रक

**विषय:** रत्नागिरी जिल्ह्यातील रत्नागिरी व चिपळूण तालुक्यातील 'क' प्रवर्गातील औद्योगिक क्षेत्रांना 'ड+' प्रवर्गाच्या सवलती व सुविधा देणेबाबत.

सामुहिक प्रोत्साहन योजना-२०१९ अंतर्गत दिनांक १६.०९.२०१९ रोजीच्या शासन निर्णयानुसार मोठे, विशाल व अतिविशाल प्रकल्पांसाठी पात्रतेचे निकष ठरविण्यात आले आहेत. सदर शासन निर्णयातील परिच्छेद २ मधील टेबल १ व टेबल २ नुसार विदर्भ, मराठवाडा, रत्नागिरी, सिंधुदूर्ग व धुळे या जिल्ह्यातील सर्व तालुक्यातील उद्योग घटकांना 'ड+' वर्गवारीतील उद्योग घटकांना अनुज्ञेय प्रोत्साहनांपेक्षा जास्तीची प्रोत्साहने अनुज्ञेय करण्यात आली आहेत. रत्नागिरी जिल्ह्यातील रत्नागिरी व चिपळूण हे दोनच तालुके 'क' प्रवर्गात असल्याने या दोन तालुक्यातील उद्योग घटकांना म.औ.वि.म. मधील जागा वाटपाच्या वेळी 'ड+' पेक्षा कमी वर्गवारीच्या उद्योग घटकांना अनुज्ञेय सवलती देय करण्याची कार्यवाही उच्च प्राधान्याने करणेबाबत महामंडळास कळविणेत आले आहे. त्याअनुषंगाने रत्नागिरी व चिपळूण तालुक्यातील उद्योग घटकांना 'ड+' वर्गवारीतील सर्व सवलती देय करणेबाबत महामंडळाच्या धोरणात सुधारणा करणे आवश्यक, असल्याने सदरहू विषय संचालक मंडळाच्या दिनांक २३.०३.२०२३ रोजी झालेल्या ३९५ व्या बैठकीत चर्चेस्तव सादर करण्यात आला. सदर प्रस्तावावर सदस्य मंडळाच्या बैठकीत सविस्तर चर्चा होऊन ठराव क्र. ६५५७ पारित करण्यात आला तसेच सदर बैठकीचे इतिवृत्तास पृष्टी मिळण्याची वाट न पाहता दिनांक १७.०४.२०२३ रोजी मा. मंत्री (उद्योग) तथा अध्यक्ष, मऔविम यांनी मान्यता प्रदान केलेली असल्याने सदर परिपत्रक निर्गमित करण्यात येत आहे.

१. रत्नागिरी जिल्ह्यातील रत्नागिरी व चिपळूण तालुक्यातील उद्योग घटकांना महामंडळाच्या प्रचलित धोरणानुसार **‘ड+’** वर्गवारीतील सर्व सवलती व सुविधा देय करण्यात येत आहेत.

सदरहू परिपत्रक मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, मऔविम यांच्या मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

**(अनिल भंडारी)**
**सह.मुख्य कार्यकारी अधिकारी (प्रशासन)**
**मऔविम, मुंबई.**

प्रति,

१. सर्व विभाग प्रमुख, मऔविम, मुंबई.
२. अतिरिक्त मुख्य अभियंता, मऔविम, पुणे/नांदेड/नागपूर.
३. सर्व अधिक्षक अभियंता, मऔविम.
४. सर्व प्रादेशिक अधिकारी, मऔविम.
५. सर्व कार्यकारी अभियंता, मऔविम.
६. सह मुख्य/उप मुख्य लेखा अधिकारी, मऔविम, मुंबई/पुणे /औरंगाबाद/नागपूर.
७. महाव्यवस्थापक (भूमि)/महाव्यवस्थापक (भूसंपादन)/व्यवस्थापक (भूमि-१/२), मऔविम, मुंबई.
८. प्रशासकीय अधिकारी, मऔविम, मुंबई.
९. व्यवस्थापक (भूसंपादन-१/२), मऔविम, मुंबई.
१०. जनसंपर्क अधिकारी, मऔविम, मुंबई.
११. सर्व क्षेत्र व्यवस्थापक, मऔविम.
१२. म.औ.वि. महामंडळाचे सर्व संचालक.
१३. सर्व महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र.
१४. सर्व औद्योगिक संघटना.
१५. मुख्य मध्यवर्ती परिपत्रक नस्ती/मुख्य कार्यकारी अधिकारी, मऔविम, कार्यालय मरोळ/जागतिक व्यापार केंद्र (डब्ल्यू.टी.सी.), कफ परेड, मुंबई